सूचना का अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००८७७

अपिलार्थी श्री. अजय के. पांडे

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार
सक्षम प्राधिकारी-४, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१.

प्रथम अपिलीय अधिकारी
सक्षम प्राधिकारी-४, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २२.११.२०२२

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्ज दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक	प्रथम अपील दिनांक	प्रथम अपील आदेश दिनांक
०३.१२.२०२१	-	०६.०१.२०२२	-

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०८.०३.२०२२ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही असे नमुद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी असे नमुद केले की, त्यांना कोणतीही माहिती मिळालेली नाही. या कारणामुळे जन माहिती अधिकारी यांनी परिशिष्ट-२ ची प्रत अपिलार्थींना १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क उपलब्ध करुन द्यावी व सार्वजनिक रुपाने संकेतस्थळावर प्रकाशित करावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

आदेश

१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.

२) अपील निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Greater Mumbai

सुनील पोरवाल
(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : २३.११.२०२२